## पदव्युत्तर संशोधन संस्था/विशेष अभ्यास संस्था सुरु करणेसाठी आवश्यक सूचना

१) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जळगांव, धुळे व नंदुरबार या तीन जिल्ह्यातील अधिक्षेत्रात पदव्युत्तर संशोधन संस्था/विशेष अभ्यास संस्थेस मान्यता मिळणेसाठी अर्ज करणा-या संस्थेने ज्या वर्षात मान्यता घ्यावयाची आहे त्या वर्षाचे अगोदरच्या वर्षातील ३१ ऑक्टोबर पूर्वी खालील सूचना कटाक्षाने पाळून विद्यापीठ अध्यादेशानुसार होणा-या शुल्कासह यासोबत जोडलेल्या विहीत नमून्यात सात प्रतींमध्ये प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. सोबत दिलेला प्रस्तावाचा नमुना हा माहितीसाठी असून आपण गरजेप्रमाणे त्याच्या जादा प्रती तयार करुन सात प्रतींमध्ये सदरचा प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करावा. प्रस्तावाच्या नमुन्याची प्रत विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

२) महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ मधील कलम ८४(१) नुसार कमीत कमी ०५ वर्ष संशोधन किंवा विशेष पाठ्यक्रमासाठी सक्रीय असलेल्या संस्थेस मान्यतेसाठी खालील बाबींच्या संबंधातील माहितीसह विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर करता येईल.

A] व्यवस्थापनाची रचना व तिचा कर्मचारी वर्ग.

B] ज्या पाठ्यक्रमासाठी मान्यता मागत आहात, ते पाठ्यक्रम.

C] त्याकरिता तरतूद केली आहे अशी जागा, साधनसामुग्री व विद्यार्थ्यांची संख्या.

D] संशोधनासाठी मार्गदर्शन करण्यांस मान्यताप्राप्त किंवा प्रयोजनासाठी विद्यापीठाकडून मान्यता मिळण्यांस योग्य असलेल्या केंद्राचा कायम असलेला मानसेवी कर्मचारी वर्ग, त्यांचा अनुभव, परिसंस्थेत केलेल्या संशोधनाचा पुरावा, केंद्राव्दारा प्रकाशित केलेली प्रकाशने, अहवाल अद्याक्षर मुद्रा पुस्तक (मोनोग्राफ) इत्यादि.

E] आकारण्यांत येणारी फी किंवा आकारण्याचा प्रस्ताव असलेली फी आणि इमारती, साधनसामुग्री व निरंतर परीरक्षण यासाठी व केंद्राच्या कार्यक्षम कामकाजासाठी केलेल्या भांडवली खर्चाच्या तरतूदी.

F] याव्यतिरिक्त विद्यापीठ अधिकार मंडळास आवश्यक वाटेल अशी आणखी कोणतीही माहिती नवीन केंद्र उघडू इच्छिणा-या संस्थेस पुरविणे आवश्यक राहील.

३) विद्यार्थ्यांसाठी पुरेशी जागा, वाचावयास प्रमाणित केलेली क्रमीक पुस्तके व संदर्भ ग्रंथ आणि विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी विद्यापीठ मान्यताप्राप्त अध्यापक वर्ग व मान्यताप्राप्त संचालक नियुक्त करणे आवश्यक राहील.

४) विद्यार्थ्यांना शिकविल्या जाणा-या वर्गात प्रती विद्यार्थी किमान ०८ चौ.फुट चटईक्षेत्र या प्रमाणे जागा. मात्र कोणत्याही शिकविण्याचे वर्ग हे किमान १८० चौ.फुट चटईइतक असणे आवश्यक आहे.

५) विद्यापीठाने प्रमाणित केलेली क्रमीक पुस्तके व संदर्भ ग्रंथ, पुरेशा प्रमाणात उपलब्ध असलेले ग्रंथालय, पुस्तकाचे सेल्फ आणि वाचण्याकरिता टेबल्स असलेला वाचनकक्ष, अध्यापकांसाठी आवश्यक त्या फर्नीचरसह स्वतंत्र सामाईक संपूर्ण प्रकाशमान खोली तसेच विद्यार्थ्यांना व

विद्यार्थिनींना स्वतंत्र सामाईक खोली, संचालक आणि शिक्षकेतर वर्गासाठी कार्यालयीन खोल्यांची व्यवस्था असणे आवश्यक राहील.

६) संस्थेच्या इमारतीमध्ये पुरेशी सॅनिटरी व्यवस्था आणि पाणीपुरवठा या सुविधा असल्या पाहिजेत.

७) विद्यार्थ्यांना क्रीडांगण आणि क्रीडा खेळासाठी आवश्यक सुविधा संस्थेच्या इमारतीजवळच उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

८) विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतीगृह असले पाहिजे. वसतीगृहातील प्रत्येक खोली एका विद्यार्थ्यांसाठी असल्यास किमान १०० चौ.फुट व दोन विद्यार्थ्यांसाठी असल्यास किमान १६० चौ.फुट असली पाहिजे. वसतीगृह इमारत संपूर्ण प्रकारे हवेशिर हवी व तेथे पुरेशी भोजनाची व सॅनिटरी व्यवस्था असली पाहिजे. अध्यापन वर्गातील एका सदस्याकडे सदर वसतीगृहाची देखरेख सोपवून त्यांना वसतीगृहात अथवा आसपास निवासस्थान असावयास पाहिजे.

९) परिसंस्थेसाठी स्वतंत्र जागा व इमारत असणे आवश्यक राहील.

१०) स्वतंत्र कॉन्फरन्स हॉल असावयास पाहिजे.

११) परिसंस्थेमध्ये शिकविण्यांत येणा-या अभ्यासक्रमानुसार आवश्यक तो स्टाफ नियुक्त करणे आवश्यक राहील.

१२) नियुक्त करण्यांत येणा-या अध्यापकास ज्या विषयासाठी नियुक्त करण्यात आले असेल त्या विषयास पदवी परीक्षेत किमान ५० टक्के (मागासवर्गीयांसाठी ४५ टक्के) व पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण (एम.फिल./पीएच.डी. पदवी प्राप्त केली असली तरी) असणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त व्याख्याता पदासाठी आवश्यक असलेली नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. ही शैक्षणिक पात्रता नसलेल्या व्यक्तींना अध्यापक म्हणून विद्यापीठाकडून मान्यता मिळणार नाही.

१३) विद्यापीठ नियमानुसार ग्रंथालयासाठी आवश्यक त्या शैक्षणिक पात्रता असलेला प्रशिक्षित ग्रंथपाल नियुक्त करणे आवश्यक आहे व त्यास विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

१४) वरिष्ठ महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्थेत मान्यताप्राप्त अध्यापक म्हणून किमान १० वर्ष सेवा झालेल्या अध्यापकांची संचालक पदी नियुक्ती करणे आवश्यक आहे. नियुक्त करण्यांत येणा-या संचालकास संस्थेच्या परिसरात अथवा जवळपास निवासाची व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच नियुक्त करण्यांत येणा-या अध्यापक पदांसाठी आणि संचालक पदासाठी विद्यापीठाकडून जाहिरात मंजूर करुन घेणे आवश्यक राहील.

१५) उपरोक्त अटींव्यतिरिक्त विद्यापीठाव्दारा तसेच शासनाव्दारा वेळोवेळी निर्गमित करण्यांत येणारे आदेश मान्यताप्राप्त संस्थेस बंधनकारक राहतील.

१६) महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ मधील तरतूदींची तसेच विद्यापीठाने वेळोवेळी लागू केलेले अध्यादेश, परिनियम, निदेश, परिपत्रक व अनुषंगिक सूचना इत्यादि केंद्रावर बंधनकारक राहील.

(प्रा.डॉ.सु.भा.चिंचोलकर)
संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ

**नव्याने पदव्युत्तर प्रयोगशाळा संशोधन केंद्र सुरु करणेसाठी/विशेष अभ्यास संस्था सुरु करणेसाठी सादर करावयाच्या प्रस्तावाचा नमुना.**

जा.क्र.:-                                                  दिनांकः-

प्रति,
मा.संचालक,
महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
जळगांव.

विषयः- पदव्युत्तर प्रयोगशाळा संशोधन केंद्रास किंवा विशेष अभ्यास संस्थेस मान्यता मिळण्यासाठी अर्ज.........

महोदय,

---------------------------------------- येथील ---------------------------------------------------------------------------
संस्थेने/सोसायटीने/विश्वस्त मंडळाने ---------------------------------------- येथे शैक्षणिक वर्ष ----------------------------
पासून ---------------------------------------------------------------------------------------------------- हा पाठ्यक्रम शिकविण्यासाठी पदव्युत्तर प्रयोगशाळा संशोधन केंद्र/विशेष अभ्यास संस्था सुरु करावयाचे ठरविले आहे. त्यास विद्यापीठाचे संलग्नीकरण लाभावे म्हणून या पत्राव्दारे मी अर्ज करीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संस्थेचे नांव आणि पूर्ण पत्ता | : | |
| २. | संस्थेचा नोंदणी क्रमांक व दिनांक | : | |
| ३. | संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबींसंबंधी तरतूद असल्यास त्या तरतूदींचा कलम नंबर, संस्थेचा ठराव क्रमांक व दिनांक | : | |
| ४. | शिक्षणक्षेत्रातील संस्थेचा अनुभव | : | |
| ५. | ज्या पदव्युत्तर प्रयोगशाळा संशोधन केंद्रास/विशेष संस्थेस संलग्नीकरण हवे आहे त्या केंद्राचे/विशेष संस्थेचे संपूर्ण नांव व पत्ता | : | |
| ६. | ज्या पाठ्यक्रमासाठी संलग्नीकरण हवे आहे त्या पाठ्यक्रमाचे नांव | : | |
| ७. | पाठ्यक्रमात संशोधनाचा अंतर्भात असल्यास संशोधनासाठी मार्गदर्शन करण्यास मान्यताप्राप्त किंवा या प्रयोजनासाठी विद्यापीठाकडून मान्यता मिळण्यास योग्य असलेल्या केंद्राचा कायम असलेला मानसेवी कर्मचारी वर्ग, त्यांचा अनुभव, परिसंस्थेत केलेल्या संशोधनाचा पुरावा, केंद्राव्दारा प्रकाशित केलेली प्रकाशने, अहवाल अद्याक्षर मुद्रा पुस्तक (मोनोग्राफ) इत्यादिविषयीची माहिती. (स्वतंत्र प्रपत्र जोडावे.) | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | केंद्राचा पाठ्यक्रमामधील/संशोधनामधील अनुभव. | : | |
| ९. | संस्थेच्या व्यवस्थापनाची घटना व तिचा कर्मचारी वर्ग (सोबत घटनेची प्रत जोडावी.) | : | |
| १०. | केंद्राच्या इमारतीच्या खोल्यांची संख्या व क्षेत्रफळाचा तपशील. तसेच सदर खोल्या ज्या प्रयोजनासाठी वापरण्यात येतील त्याचा तपशील. (पुष्ठ्यर्थ आवश्यक ती साक्षांकीत कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.) | : | |
| ११. | केंद्राचे सर्व वर्ग, प्रयोगशाळा, ग्रंथालय आणि कार्यालय इत्यादि बाबींसाठी पुरेशी इमारत संस्थेने भाड्याने घेतली आहे/संस्थेच्या मालकीची आहे/केंद्रासाठी इमारत स्वतःच्या मालकीची नसल्याने संस्थेच्या मालकीच्या जागेत कायमची इमारत बांधण्याचा इरादा आहे. (पुष्ठ्यर्थ आवश्यक ती साक्षांकीत कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.) | : | |
| १२. | केंद्राच्या कार्यक्षम कामकाजासाठी केलेल्या भांडवली खर्चाच्या तरतूदी. | : | |
| १३. | ३१ मार्च, २००९ रोजी संस्थेच्या वित्तीय स्थितीबद्दलची माहिती खालीलप्रमाणे द्यावी. | | |
| अ) | स्थावर मालमत्ता | : | |
| ब) | जंगम मालमत्ता | : | |
| क) | बँकेतील रोख | : | |
| १४. | वरील उल्लेखित बाबींशिवाय केंद्राच्या आकस्मिक व अनाकस्मिक खर्चासाठी करण्यांत येणा-या आर्थिक तरतूदींचा तपशील. | : | |
| १५. | केंद्राच्या संचालनाचे अधिकार ज्या संस्थेच्या/ सोसायटीच्या/विश्‍वस्त मंडळाच्या नियामक मंडळाकडे राहील त्या संस्थेचे/सोसायटीचे/ विश्‍वस्त मंडळाचे नांव. | : | |
| १६. | केंद्र सातत्याने व समाधानकारक चालण्याच्या दृष्टीने आवश्यक ती आर्थिक साधने. (सोबत आयव्ययचा तक्ता जोडणे आवश्यक आहे.) | : | |

# वचन / प्रतिज्ञा

मी, ------------------------------------------ ------------------------------------------- अध्यक्ष, ------------------------------------------
(संस्थाध्यक्षांचे नांव)

-------------------------------------------------------------------------------------------------------------------- संस्थेच्या वतीने वचन देतो की/ प्रतिज्ञा करितो की,

१) अर्जात भरलेली व सहपत्राव्दारे पुरविण्यांत आलेली माहिती माझ्या मते सत्य आहे.

२) केंद्रात जो पाठ्यक्रम शिकविला जाईल त्यासाठी योग्यताप्राप्त शिक्षकांची नियमानुसार नेमणूक करण्यांत येऊन त्यांना विद्यापीठाची मान्यता प्राप्त करुन घेण्यांत येईल.

३) नियमाप्रमाणे शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल.

४) संलग्न केंद्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी विद्यापीठाने केलेल्या अधिनियमांशी सुसंगत असे नियम केंद्रातील सेवकांसाठी करण्यांत येतील.

५) केंद्रास संलग्नीकरण प्राप्त झाल्याबरोबर मान्यताप्राप्त संचालकांची नियुक्ती करण्यांत येऊन त्यास विद्यापीठाची मान्यता घेण्यांत येईल. तसेच केंद्राच्या परिसरातील त्यांचे कार्यालयात दूरध्वनी व अनुषंगिक इतर सेवा उपलब्ध करुन देण्यांत येतील.

६) केंद्राची ग्रंथालय मुख्य इमारतीतच राहील/स्वतंत्र इमारतीत राहील. ग्रंथालयाचे क्षेत्रफळ अदमासे ------------------------------ चौ.फुट राहील. निरनिराळ्या विषयावरील पुस्तकांखेरीज पाठ्यपुस्तके/ नियतकालिके, नकाशे, संदर्भ ग्रंथ इत्यादि गोष्टी ग्रंथालयासाठी विकत घेतल्या जातील व त्यासाठी विद्यापीठाच्या नियमानुसार आवश्यक ती तरतूद करण्यांत येईल.

७) केंद्राच्या ज्या अभ्यासक्रमास प्रयोगशाळेची आवश्यकता असेल त्या ठिकाणी प्रयोगशाळा उपलब्ध करुन देण्यांत येईल व त्यासाठी विद्यापीठाच्या नियमानुसार आवश्यक ती तरतूद करण्यांत येईल.

८) केंद्राचे संचालक तसेच अधिव्याख्याते यांच्या निवासस्थानाकरिता केंद्राच्या आवारात किंवा केंद्राच्या जवळपास सोय करण्यांत येईल.

९) महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ मधील कलम ८१(१) चे तंतोतंत पालन केले जाईल.

१०) महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ मधील कलम ८५ नुसार केंद्रासाठी स्थानिक व्यवस्थापन समिती स्थापन करण्यांत येईल.

११) महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ मधील तरतूदींचे तसेच विद्यापीठाच्या नियमांचे, सूचनांचे व निदेशांचे वेळोवेळी पालन करण्यांत येऊन परिनियम व अध्यादेशातील तरतूदी आमचेवर बंधनकारक राहतील.

१२) विद्यापीठ ठरवून देईल त्याप्रमाणे अभ्यासक्रमासाठी शुल्क आकारण्यांत येईल.

१३) विद्यापीठाने ठरवून दिलेल्या प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

१४) मिळालेल्या मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण करुन घेण्यांत येईल.

ठिकाण:- अध्यक्षांची सही

दिनांक:- संस्थेचा शिक्का व सील

प्रस्तावासोबत खालील सहपत्रे जोडणे अनिवार्य आहेत.

१) विहीत शुल्काचा मा.कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचे नांवे काढलेला धनाकर्ष (Demand Draft.)

२) संस्थेच्या पंजीयनाची प्रत.

३) संस्थेच्या संविधानाची प्रत.

४) केंद्रास विद्यापीठाचे संलग्नीकरण घेण्यासंबंधी संस्थेच्या ठरावाची प्रत.

५) चालू वर्षाच्या जमाखर्चाचा तक्ता.

६) संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी.

७) अर्जातील अ.क्र. ७, ९, १०, ११ व १६ संदर्भात आवश्यक ती साक्षांकीत कागदपत्रे.